## MAHARASHTRA ACT No. XXVIII OF 1983

## THE MAHARASHTRA SPECIFIED CO-OPERATIVE SOCIETIES (POSTPONEMENT OF ELECTIONS DUE TO DROUGHT CONDITIONS IN THE STATE) ACT, 1983.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक १ ऑगस्ट १९८३ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एस. ए. धोत्रे,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XXVIII OF 1983

## AN ACT TO PROVIDE FOR THE POSTPONEMENT OF ELECTIONS TO COMMITTEES OF SPECIFIED CO-OPERATIVE SOCIETIES BECAUSE OF WIDESPREAD DROUGHT CONDITIONS IN THE STATE.

[ राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात, दिनांक ३ ऑगस्ट १९८३ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला. ]

### सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८

### राज्यात मोठ्या प्रमाणावर पसरलेल्या अवर्षणाच्या परिस्थितीमुळे विनिर्दिष्ट सहकारी संस्थांच्या समित्यांच्या निवडणुका लांबणीवर टाकण्यासाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.

१९६१ चा महा. २४. ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ७३-ग यात निर्दिष्ट केलेल्या प्रवर्गातील सहकारी संस्थांच्या समिती सदस्यांच्या निवडणुका जिल्हाधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली पार पाडणे आवश्यक आहे ;

आणि ज्याअर्थी, राज्यातील बऱ्याच जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर अवर्षणाची परिस्थिती असल्याने विनिर्दिष्ट संस्थांच्या निवडणुका घेण्यास आवश्यक असलेले जिल्हाधिकारी व त्यांचा कर्मचारीवर्ग यांना, अवर्षण निवारक कामे पार पाडण्यासाठी व पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे आवश्यक होते आणि त्यामुळे ते निवडणुकीच्या कामासाठी उपलब्ध होऊ शकणार नव्हते, आणि या कठीण काळात अशा निवडणुका घेणे सर्वसाधारण जनतेच्या दृष्टीनेसुद्धा गैरसोयीचे झाले असते ;

आणि ज्याअर्थी, या व इतर कारणांसाठी विनिर्दिष्ट संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका व पोट निवडणुका विशिष्ट मुदतीसाठी लांबणीवर टाकणे इष्ट होते ;

आणि ज्याअर्थी, अशा प्रकारे निवडणुका लांबणीवर टाकण्यात येणार असल्याने समित्यांच्या काही सदस्यांचा व प्रशासकांचा पदावधी वाढवणे आवश्यक होते ;

आणि ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

आणि ज्याअर्थी, उपरोक्तप्रमाणे निवडणुका लांबणीवर टाकणे व पदावधी वाढविणे यांसाठी आणि तत्संबंधित बाबींकरिता तरतूद करण्यासाठी विशेष कायदा करण्याकरिता तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक ठरेल अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री झालेली होती ; आणि म्हणून, त्यांनी महाराष्ट्र विनिर्दिष्ट सहकारी संस्था (राज्यातील अवर्षणाच्या परिस्थितीमुळे निवडणुका लांबणीवर टाकणे) अध्यादेश, १९८३ हा, १२ मे १९८३ रोजी प्रख्यापित केला होता ; १९८३ चा महा. अध्या. ८.

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ;

त्याअर्थी, आता भारतीय गणराज्याच्या चौतिसाव्या वर्षी पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, प्रारंभ व मुदत. १. (१) या अधिनियमास महाराष्ट्र विनिर्दिष्ट सहकारी संस्था (राज्यातील अवर्षणाच्या परिस्थितीमुळे निवडणुका लांबणीवर टाकणे) अधिनियम, १९८३ असे म्हणता येईल.

(२) तो १२ मे १९८३ रोजी अंमलात आल्याचे मानण्यात येईल.

(३) तो, ३१ ऑक्टोबर १९८३ ही तारीख धरून तोपर्यंत किंवा राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशी आधीची तारीख धरून तोपर्यंत, अंमलात राहील व त्यानंतर त्याची मुदत संपेल. या अधिनियमाची मुदत संपल्यानंतर, तो जणू काही महाराष्ट्र अधिनियमाद्वारे निरसित करण्यात आला आहे अशा रीतीने, मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ चे कलम ७ लागू होईल.

व्याख्या २. या अधिनियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) "प्रशासक", "समिती" व "संस्था" यांचे अर्थ, सहकारी संस्था अधिनियमात त्यांना जे अर्थ नेमून दिलेले आहेत तेच असतील ;

(ब) "विनिर्दिष्ट संस्था" म्हणजे सहकारी संस्था अधिनियमाच्या कलम ७३ग मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रवर्गांपैकी कोणत्याही प्रवर्गातील संस्था ;

(क) "सहकारी संस्था अधिनियम" म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०. १९६१ चा महा. २४.

विनिर्दिष्ट संस्थांच्या समित्यांच्या निवडणुका लांबणीवर टाकणे. ३. (१) सहकारी संस्था अधिनियम आणि तदन्वये करण्यात आलेले नियम व उपविधी अथवा कोणत्याही न्यायालयाने दिलेला कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा अथवा आदेश यात कोणतीही गोष्ट अंतर्भूत असली तरी,—

(अ) हा अधिनियम अंमलात असण्याच्या मुदतीत, कोणत्याही विनिर्दिष्ट संस्थेच्या समितीची कोणतीही निवडणूक अथवा समितीतील कोणतेही नैमित्तिक रिकामे पद भरण्याकरिता कोणतीही निवडणूक घेण्यात किंवा पूर्ण करण्यात येणार नाही. ह्या अधिनियमाच्या प्रारंभाच्या वेळी कोणत्याही प्रकरणी निवडणूक कार्यक्रम घोषित करण्यात आलेला असेल अथवा कोणत्याही प्रकरणी निवडणुकीच्या प्रक्रियेला सुरुवात झाली असेल; परंतु प्रत्यक्ष मतदान घेण्यात आलेले नसेल तर असा कोणताही कार्यक्रम किंवा त्याखाली करण्यात आलेली कोणतीही कृती या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपासून रद्द झाली असल्याचे समजण्यात येईल ;

(ब) विनिर्दिष्ट संस्थांच्या समित्यांचे जे सदस्य ह्या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेला पदावर होते त्यांचा पदावधी (मग त्यांचा पदावधी अगोदरच संपलेला असो अथवा ह्या अधिनियम अंमलात असण्याच्या मुदतीत उक्त तारखेला किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी संपणार असो) यथास्थिति, वाढवण्यात आल्याचे किंवा वाढवण्यात येणार असल्याचे समजण्यात येईल; आणि हा अधिनियम अंमलात असण्याच्या मुदतीत असे सदस्य आपले पद धारण करणे चालू ठेवतील ;

(क) कोणत्याही विनिर्दिष्ट संस्थांचे कामकाज पाहण्यासाठी, सहकारी संस्था अधिनियमाच्या कलम ७७-अ अथवा कलम ७८, पोट-कलम (१) अन्वये नेमण्यात आलेले जे कोणतेही प्रशासक हा अधिनियम अंमलात येण्याच्या प्रारंभाच्या तारखेला पदावर होते त्यांचा पदावधी (मग त्यांचा पदावधी अगोदरच संपलेला असो किंवा हा अधिनियम अंमलात असण्याच्या मुदतीत कोणत्याही वेळी संपणार असो) यथास्थिति वाढवण्यात आल्याचे किंवा वाढवण्यात येणार असल्याचे समजण्यात येईल; आणि हा अधिनियम अंमलात असण्याच्या मुदतीत असे प्रशासक आपले पद धारण करणे चालू ठेवतील.

(२) या कलमाद्वारे अशा प्रकारे वाढवण्यात आलेला सदस्यांचा किंवा प्रशासकांचा पदावधी संपल्यानंतर, पुनर्रचित समितीची पहिली बैठक घेण्यात येईपर्यंत ते आपले पद धारण करणे चालू ठेवतील.

४. प्रत्येक विनिर्दिष्ट संस्थेच्या समितीला, तिच्या सदस्यांनी राजीनामा दिल्यामुळे किंवा ते मरण पावल्यामुळे किंवा अन्य कारणांमुळे रिकामे झालेले कोणतेही पद भरण्यासाठी, याबाबतीत उचित अर्हता धारण करीत असेल अशा कोणत्याही सदस्याला स्वीकृत करून घेण्याचा अधिकार असेल. स्वीकृत करून घेण्याचा अधिकार.

५. या अधिनियमात कोणतीही गोष्ट अंतर्भूत असली तरी, ह्या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपूर्वी किंवा त्या तारखेनंतर नोंदण्यात आलेल्या विनिर्दिष्ट संस्थेच्या बाबतीत आणि संस्थेची नोंदणी करण्यासाठी अर्ज करते वेळी ज्या व्यक्ती त्यात सामील झाल्या होत्या त्या सर्वांची पहिली सर्वसाधारण सभा ह्या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेला किंवा त्यानंतर घेण्यात येणार असेल त्याबाबतीत, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ च्या नियम ५९ अनुसार एका तात्पुरत्या समितीची रचना करण्यात येईल ; आणि अशा रीतीने रचना करण्यात आलेल्या तात्पुरत्या समितीचे सदस्य, अधिनियम अंमलात असतानाच्या मुदतीत पदे धारण करतील. तात्पुरत्या समित्यांची रचना.

६. कलम ३ अन्वये, यथास्थिति ज्यांचा पदावधी वाढवण्यात आला असेल किंवा वाढविण्यात आल्याचे समजण्यात येईल असे, कोणत्याही विनिर्दिष्ट संस्थांचे कामकाज पाहण्यासाठी नेमण्यात आलेल्या समित्यांचे सर्व सदस्य आणि सर्व प्रशासक त्यांच्या वाढवलेल्या संपूर्ण कालावधीतही, यथास्थिति असे सदस्य अथवा प्रशासक म्हणून सर्व अधिकारांचा वापर करण्यास अथवा अशी सर्व कर्तव्ये व कामे पार पाडण्यास सक्षम असतील ; आणि पदावधी वेळेवर वाढवण्यात आला नव्हता अथवा अन्यथा उचित रीत्या वाढवण्यात आला नव्हता अथवा वाढविलेल्या मुदतीत समिती सदस्य अथवा प्रशासक, यथास्थिति समितीचे, सदस्यांचे अथवा प्रशासकांचे सर्व अधिकार वापरू शकत नव्हते किंवा सर्व कर्तव्ये किंवा कामे पार पाडू शकत नव्हते याच केवळ कारणावरून अशा कोणत्याही समितीने, सदस्याने किंवा प्रशासकाने केलेली कोणतीही कृत्ये विधिअग्राह्य मानता येणार नाहीत किंवा कोणत्याही न्यायालयात त्याबद्दल आक्षेप घेता येणार नाही. कलम ३ अन्वये ज्यांचा पदावधी वाढवण्यात आल्याचे समजण्यात येईल त्या समित्यांची आणि सदस्यांची व प्रशासकांची कृत्ये विधि-ग्राह्य असणे.

७. या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये अन्यथा उपबंधित केले असेल त्याव्यतिरिक्त, सहकारी संस्था अधिनियम इतर सर्व बाबतीत संबंधित विनिर्दिष्ट संस्थेला लागू होईल. सन १९६१ चा महा. अधिनियम २४ ची प्रयुक्ती.

अडचणी दूर करणे. ८. ह्या अधिनियमाचे उपबंध अंमलात आणताना, अथवा त्यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही मजकुरामुळे, अथवा ह्या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही बाबींच्या संबंधात, सहकारी संस्था अधिनियमातील अथवा संस्थांशी संबंधित असलेल्या कोणत्याही इतर कायद्यातील उपबंध अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास ती दूर करण्यासाठी प्रसंगपरत्वे, राज्य शासनाला, आदेश काढून त्यास आवश्यक वाटेल अशी कोणतीही गोष्ट करता येईल.

सन १९८३ चा महा. अध्यादेश ८ चे निरसन व व्यावृत्ती. ९. (१) महाराष्ट्र विनिर्दिष्ट सहकारी संस्था (राज्यातील अवर्षणाच्या परिस्थितीमुळे निवडणुका लांबणीवर टाकणे) अध्यादेश, १९८३ याद्वारे निरसित करण्यात येत आहे. १९८३ चा महा. अध्या. ८.

(२) असे निरसन करण्यात आले असले तरीही, उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कृती, या अधिनियमाच्या तत्सम उपबंधांन्वये, यथास्थिति केलेली गोष्ट किंवा कृती असल्याचे समजण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)

न. ब. पाटील,
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.